# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र १०७ दिनांक- १९/०४/२०२१

## नवघर पोलीस ठाणे कार्यक्षेत्रात, मानवी आरोग्यास अपायकारक असलेला पान मसाला व सुंगधीत तंबाखु,या विक्रीकरीता साठवणुक केलेल्या मालावर श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - ०१ यांची कारवाई.

*************************

दि. १५.०४.२०२१ रोजी एका फ्लॅटमध्ये मानवी आरोग्यास अपायकारक असलेला व महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधी तंबाखु विक्रीकरीता साठवणुक केली असल्याची श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, मिरारोड यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली.

श्री.अमित काळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पोलीस पथकाने भाईंदर पुर्व, न्यु गोल्डन नेस्ट, गोल्डन ईगल कॉम्प्लेक्स, फ्लॅट नं. ए-००३ येथे २१.०५ वाजता छापा घातला असता फ्लॅटमध्ये १) नायब रामकिशन पाल, वय-३४ वर्षे, रा. फ्लॅट नंबर ए-४, नर्मदा टॉवर, खारीगाव, कॅबीन क्रॉस रोड, भाईंदर पुर्व, ता.जि.ठाणे २) अनिल इंद्रजित यादव, वय-३३ वर्षे, रा. फ्लॅट नंबर ए-३, नर्मदा टॉवर, खारीगाव, कॅबीन क्रॉस रोड, भाईंदर पुर्व, ता.जि.ठाणे, ३) गौरव जयंतीभाई हपानी, वय-४० वर्षे, रा. फ्लॅट नंबर ए-४०२, गोल्डन ईगल कॉम्प्लेक्स, न्यु गोल्डननेस्ट, भाईंदर पुर्व, ता.जि.ठाणे असे मिळून आले. तसेच फ्लॅटमध्ये रजनीगंधा सुगंधित पान मसाला, K.K.1000, दोस्ती केसरयुक्त सुंगधी पानमसाला, बुलंद एक्सपोर्ट क्वालिटी गुटखा, D-5 तंबाखु, V-1 सुगंधीत तंबाखु व रोख रक्कम असा एकुण ७,६३,००० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

या प्रकरणी वरील ३ इसमांसह इतर ५ जणाविरुद्ध नवघर पो.ठाणे गुरनं. I ३५५/२०२१ कलम ३२८, २७२, २७३, १८८ भादंवि. सह कलम २६(२),(४), ३०(२)(ए), ५९ अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ प्रमाणे दिनांक १६.०४.२०२१ रोजी गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कारवाई श्री.अमित काळे पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१ यांचे मार्गदर्शनाखाली पोउनि.श्री.सचिन काशीद, सफौ.विनायक मगर, पोहवा.अजय मांडोळे, पोना.संदीप शेळके, पोना.अंकुश पाटील, पोकॉ..विनोद चव्हाण, मपोना विजेता नाईक, मपोशि.लतादेवी एक्कलदेवी यांनी केली आहे.

Scanned with CamScanner